# यशोगाथा

## काकडी उत्पादक गट

पाथरी तालूक्यातील बाभळगाव हे मोठया लोकवस्तीचे गाव आहे. येथील शेतकरी मुख्यतः सोयाबीन, कापूस, ऊस अशी नगदी पिकासह फार किरकोळ प्रमाणात भाजीपाला उत्पादन करत असत. आत्मा यंत्रणेतील श्री. जाधवर यांनी घेतलेल्या अथक प्रयत्नामूळे हे शेतकरी संघटीत झाले. या शेतकऱ्यांनी गट तयार करून आत्मा अंतर्गत नोंदणी केली. अशा गटापैकी एक बळीराजा पुरुष शेतकरी गट.

आत्मा अंतर्गत या गटाची श्री. जाधवर यांनी **बन्सारोळा व सिरसाळ** येथे शेतकरी सहल काढली. तेथे शेतकऱ्यांनी बी.बी.एफ. सोयाबीन लागवड पध्दत तसेच निर्यातक्षम भेंडी उत्पादन तंत्रज्ञान बघून शेतकरी प्रभावीत झाले. त्या गटापैकी बळीराजा पुरुष शेतकरी गटांनी बीगर हंगामी काकडी उत्पादन घेण्याचे ठरविले.

आत्मा योजने अंतर्गत काकडी पिकाविषयी बळीराजा पुरुष शेतकरी गटांना तालूका कृषि अधिकारी श्री. बी. आर. काकडे, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री. बोरवंडकर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे प्रा. आनंद गोरे आणि प्रा. डी. डी. पटाईत यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले.

आत्मा योजने अंतर्गत दि. 06/02/2013 रोजी 15 सदस्यांचा **बळीराजा पुरुष शेतकरी गट, बाभळगाव येथे स्थापन झाला.** रु. 200 प्रमाणे आज बँकेच्या खात्यावर 82,000/- नियमित बचत केली आहे. या गटाच्या 9 सदस्यांनी 14 एकरवर काकडी या पीकाची ऑक्टोंबर 2013 रोजी लागवड केली.

काकडीची लागवड सरी-वरंबा पध्दतीने केली असून त्याला साथ ठिबक सिंचनाने दिली. काकडीची विक्री औरंगाबाद येथे एकत्रीतरित्या करण्यात आली.

**प्रत्येक शेतकऱ्यास 70 हजार रुपये एकरी निव्वळ नफा झाला.** गटाच्या वतीने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून वनराई बंधारा बांधण्यात आला. तसेच या गटांनी संघटीत होऊन बांधावर खत वाटप योजने अंतर्गत खत खरेदी करण्यात आले. या गटाने एकत्रीतरित्या बळीराजा कृषि सेवा केंद्र लवकरच सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे.

तसेच या गटाने पिपीपी अंतर्गत सधन कापूस लागवड नूजविड सिड्स कंपनीचे कापूस बियाणे लागवड केली आहे.